वसई विरार शहर महानगरपालिका
नविन प्रशासकीय इमारत,यशवंत नगर,विरार (पश्चिम)

जावक क्र.ववि‌शम/क्रीडा विभाग/५५०/२०२६-२७
दि. ३० /१०/२०२६

वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत आयोजित १३ वी राष्ट्रीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा २०२६ करिता शालेय विद्यार्थ्यांची नोंदणी सुलभ व सुलभतेने करण्यासाठी खालील सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या क्रीडा विभागाकरिता इच्छूक व्यक्ती, संस्था, पुरवठादार यांचे कडून खालील बाबी करिता दिनांक.१३/११/२०२६ रोजी दुपारी ०४.०० वाजे पर्यंत सिलबंद दरपत्रक सोबतच्या अटी व शर्तींच्या अधीन राहून मागविण्यात येत आहे.

दरपत्रक (QUOTATION)

अ.क्र.	तपशील	दर (रु.)	GST रक्कम	एकूण रक्कम GST सहित
१	ऑनलाइन पोर्टल तयार करुन नोंदणी प्रणाली, शाळा लॉगिन व शालेय विद्यार्थी नोंदणी सुविधा, प्रवेशपत्र, अहवाल व प्रशासकीय डॅशबोर्ड, होस्टिंग, देखभाल व तांत्रिक सहाय्य करणे.			

अटी व शर्ती :- लिफाफा क्र-१ (तांत्रीक बाबी)

१. निविदाधारक यांचे GST नोंदणीप्रमाणपत्र व पॅनकार्ड जोडणे आवश्यक आहे.
२. निविदाधारक यांचे आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र (Shop Act License)
३. निविदाधारके यांचे बँक खाते तपशिल व रद्द केलेला धनादेश
४. शासकीय/निमशासकीय तसेच इतर अन्य ठिकाणी समकक्ष काम केल्याचे प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील.
५. भागीदारी संस्था असल्यास भागीदारी करारनामा दरपत्रकासोबत जोडणे बंधनकारक राहील.
६. कोणत्याही शासकीय/ निमशासकीय संस्थेकडून काळया यादीत समाविष्ट नसल्याचे रक्कम रु.१०० च्या मुद्रांक शुल्कावर स्वयंमघोषणा पत्र.
७. महापालिका अधिकारी/कर्मचारी यांचा हितसंबंध नसल्याबाबतचे प्रमाणपत्र.
८. दरपत्रकामधील संपुर्ण बाबींचे दर न भरलेली अशी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाही.
९. तत्सम कामाचा अनुभव व कार्यादेश/ काम पुर्णत्वाचा दाखला.
१०. रक्कम रु. २,१००/- रक्कमेचा वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नावे डिमांडड्राफ्ट आवश्यक
११. निविदाकाराचे दरपत्रका संदर्भात पत्र व निविदाकाराबाबत संपूर्ण माहिती, कार्यालयाचे दुरध्वनी क्रमांक, मोबाईल क्रमांक नमुद केलेला असणे आवश्यक आहे.

लिफाफा क्र-२ (दराचा लिफाफा)

१. दरपत्रक निविदाधारक यांचे लेटरहेडवर स्वाक्षरी व शिक्का असलेले दरपत्रक सादर करावे.

इतर अटी व शर्ती :-

१. सदर कामाची माहिती कार्यालयीन वेळेत दिनांक.०२/११/२०२६ ते दिनांक.१३/११/२०२६ या कालावधीत क्रीडा विभागा मार्फत उपलब्ध करुन देण्यांत येईल.
२. दरपत्रात दर विहित केलेल्या रकान्यात स्पष्ट अंकात व अक्षरात खाडाखोड न करता लिहावेत. दरपत्रक मुदतीमध्ये व वेळेमध्ये महापालिकेच्या मुख्यालयात आवक-जावक विभागात सादर करणे बंधनकारक राहिल.
३. दरपत्रकास मंजुरीची समज दिल्यानंतर २ दिवसात कार्यालयात उपस्थित राहुन करारनामा करावयाचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.
४. दरपत्राकमधील नमुद बाबींचे दराच्या एकुण रक्कमेवर निविदा स्विकृती करण्यांत येईल.

Scanned with OKEN Scanner

५. निविदेच्या एकूण रक्कमेवर ३% सुरक्षा अनामत रक्कम दर करार करतेवेळी घेण्यात येईल. (शासन निर्णय उद्योग ऊर्जा दि.१/१२/२०१६ नियम ४०६ अन्वये.)
६. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार महानगरपालिकेचा राहिल.
७. वरिल अटींचे पालन जे व्यक्ती, संस्था,पुरवठादार करणार नाहीत त्यांना पडताळणी अंती अपात्र ठरविण्यांत येतील.
८. याकामाची दरपत्रके स्वत:चे लेटरपॅडवर बंद पाकिटातुन दोन लिफाफे पद्धतीने दिनांक. १३/११/२०२६ रोजी दुपारी ०४.०० पर्यंत महापालिकेच्या मुख्यालयातील आवक-जावक विभागात सादर करावीत.मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके त्याच दिवशी दिनांक. १३/११/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता मा.उपआयुक्त, क्रीडा विभाग यांचे दालनात उपस्थित दरपत्रकादार अथवा त्यांचे प्रतिनिधी ह्यांचे समक्ष उघडण्यांत येतील.

कामाचे स्वरूप व आवश्यक सुविधा

१. शाळांची ऑनलाइन नोंदणी व स्वतंत्र लॉगिन सुविधा उपलब्ध करून देणे.
२. विद्यार्थ्यांचे नाव, जन्मतारीख, लिंग, शाळेचे नाव व आवश्यक माहिती संकलित करणे.
३. वय व लिंगानुसार स्पर्धा गटाचे स्वयंचलित वर्गीकरण करणे.
४. पालकांचे संमतीपत्र व घोषणापत्र ऑनलाइन उपलब्ध करून देणे.
५. प्रत्येक विद्यार्थ्यास स्वतंत्र नोंदणी क्रमांक व प्रवेशपत्र (Admit Card) उपलब्ध करून देणे.
६. शाळानिहाय, वयोगटानुसार व स्पर्धा प्रकारानुसार अहवाल तयार करण्याची सुविधा.
७. महानगरपालिका प्रशासनासाठी स्वतंत्र डॅशबोर्ड व Excel/PDF स्वरूपात माहिती डाउनलोड करण्याची सुविधा.
८. विद्यार्थ्यांच्या नोंदणीची पडताळणी, दुबार नोंदणी नियंत्रण व डेटा सुरक्षित ठेवणे.
९. वेबसाईट होस्टिंग, देखभाल व मॅरेथॉन स्पर्धेच्या दिवशी आवश्यक तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देणे.
१०. सदर दरामध्ये पोर्टल तयार करणे, अंमलबजावणी, देखभाल व स्पर्धेच्या दिवसापर्यंत आवश्यक तांत्रिक सहाय्य यांचा समावेश असावा. तसेच काम पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती महानगरपालिकेस सुपूर्द करणे बंधनकारक राहील.

स्थळ - वसई विरार महानगरपालिका, मुख्यालय, विरार (पश्चिम)
दिनांक - ३०/१०/२०२६

(डॉ.करुणा जुईकर)
(उपआयुक्त, क्रीडा विभाग)
वसई विरार शहर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner